पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा /१७१७/२०१३
पुणे १ दिनांक:- २७/०५/२०१३

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे संचलित,
ब्लॉसम पब्लिक स्कुल(न्यू), न-हे, ता. हवेली जि.पुणे

**विषय :- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाशी संलग्नित कायम विना अनुदान तत्वावर इंग्रजी शाळेला मान्यताबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९) /माशि-१ दि.२०/०६/२०१२

२. शासनाचे हेतुपत्र क्र. हेतुप-२०१२/(४७/१२) माशी-५ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मंबई-३२ दिनांक २९/१०/२०१२

३. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-१ यांचे कडील पत्र दिनांक २०/०२/२०१३.

४. शासनाचे पत्र क्र. मान्यता-२०१३/(५१/१३ माशि-१ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि.२३/०५/२०१३

उपरोक्त विषयाच्या अनुषगाने संदर्भाधिन क्र. ३ च्या अन्वये पत्राच्या अनुषंगाने **जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे संचलित, ब्लॉसम पब्लिक स्कुल(न्यू), न-हे, ता. हवेली जि.पुणे** येथे सुरु केली आहे. सदर शाळा सहितेनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करीत आहे. तसेच शाळा बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम ११, पोट नियम (४) मधील विधीत केलेल्या अटी व शर्ती पुर्ण करीत आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ अनुसार आपल्या संस्थेच्या **ब्लॉसम पब्लिक स्कुल(न्यू), न-हे, ता. हवेली जि.पुणे** या शाळेस खालील अटी व शर्तींच्या पूर्तता करण्याच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

१) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

२) सदर शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

३) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) संस्थेनें सदर शाळेला शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

५) संस्थेने सदर शाळेसाठी स्वतंत्र क्रिडांगणाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

६) संस्थेने सदर शाळेत मुख्याध्यापक पदी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र.३(१) (ब) नुसार पात्र व्यक्तिची नियुक्ती करावी.

७) संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नियुक्त करावा.

८) संस्थेने सदर शाळेत शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करताना बिंदु नामावलीनुसार करण्यात याव्यात.

९) संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

१०) संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

११) संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरसे फर्निचर, क्रिडा साहित्य, कार्यानुभव साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

१२) संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करावी.

१३) मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय असावी.

१४) संस्थेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१५) शाळेस परवानगी व मान्यता देणेसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे शाळेने थांबविले आहे असे निदर्शनास आल्यास शाळेची मान्यता महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम १२ नुसार काढून घेण्यात येईल.

१६) शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्याच्या आत परवानगी दिलेल्या ठिकाणी शाळा सुरु करेल.

१७) शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे. त्याठिकाणी १८ महिन्याच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१. मा. सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहिती करीता सादर
२. मा. शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे -१.
३. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१

ALE
OUT
Mah.)
3243
R Y
T OF INDIA

15139


# Jayawant Shikshan Prasarak Mandal

(Regd.No: MAH/632/98/ Pune & Trust No. F/14907/98)

PROF. SHIVAJIRAO SAWANT
M.A.D.A.E.,D.D.
PRESIDENT

PROF. DR.TANAJI SAWANT
B.E.(Elect.), PGDM,Ph.D
FOUNDER SECRETARY

**Regd. Off.:** S. No. 80, Pune-Mumbai Bypass Highway, Tathawade, Pune-411033. **Phone:**(020)22933423,22934084.**Fax:** (020) 22933424
**Corporate Office : "SAWANT CORNER",** S.No. 84/2E1/5,3th Floor,Katraj Chowk, New Pune - Mumbai By Pass Highway, Katraj, Pune - 46.
**Phone :** 020-24317383/84/85. www.jspm.edu.in


Date :: 29/04/2026

प्रति

मा. शिक्षणाधिकारी

प्राथमिक विभाग

जिल्हा परिषद , पुणे

विषय : सन २०२५ ते २०२८ साठी स्वमान्यता मिळणे बाबत

महोदय ,

आमच्या **ब्लॉसम पब्लिक स्कूल न्यू नर्हे** **( UDISE 27250509909 )** विद्यालयाची सन २०२५ ते २०२८ साठी स्वमान्यता मिळणे साठी आपल्या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे, आमच्या विद्यालयास मा. शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद पुणे, यांच्या कडून **दिनांक २७/०५/२०१३ ( जा.क्र.जी.प.शिक्षण / प्राथ / खाप्राशा/ १७१७ /२०१३ )** प्रथम मान्यता देण्यात आलेली आहे , सदर आदेशाची प्रत स्वमान्यते साठी सादर करण्यात आलेली आहे , वरील नमूद आदेश प्रथम मान्यता म्हणून देण्यात अली होती, आमच्या कडून स्वमान्यते साठी सर्व कागद पात्रांची पूर्तता करण्यात अली आहे ,

आपल्याला विनंती आहे कि वरील नमूद प्रथम मान्यता ग्राहय धरून आमच्या विद्यालयास सन २०२५ ते २०२८ साठी स्वमान्यता देण्यात यावी ,

आपला विश्वासू

Campus Director
Jayawant Shikshan Prasarak Mandal
Narhe Campus, Narhe, Pune - 411 041

संकुल संचालक

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ

नर्हे, पुणे.